नमुना-६

दस्त क्र. ८४७/२०१५

९४-५५

३. सदर मिळकतीचे क्षेत्रावर करावयाचे बांधकामाचे प्लॅन मंजूर करणे, मंजूर झालेले प्लॅन रिव्हाईज करणे, रिव्हाइज प्लॅन तयार करणे, त्यावर सह्या करणे, प्लॅन मंजुरीस नाशिक महानगरपालिका, नाशिक यांचेकडे हजर करणे, महापालिकेची स्क्रुटीनी फी, डेव्हलपमेंट चार्जेस भरणे, पावत्या घेणे, प्लॅन रिव्हाईज करणे, जागेवर बांधकाम करणे, बांधकाम पुर्णत्वाचे दाखले मिळविणे वगैरे सर्व कामे करणे.

४. उपरोक्त मिळकत क्षेत्राच्या ठिकाणी इलेक्ट्रीक कनेक्शन, वॉटर कनेक्शन मिळविणे, त्यासाठी डिपॉझीट रक्कमा भरणे, त्या डिपॉझीटच्या रक्कमा परत घेणे, आणि त्या सबंधात पुर्तता करणे.

५. उपरोक्त मिळकत क्षेत्राचे विकसन करण्यासाठी आर्किटेक्ट, इंजिनियर, मुकादम अगर मजुर वर्ग यांची नियुक्ती करणे, त्यांच्याकडून कामे करुन घेणे, त्यांचा मेहनताना ठरविणे व देणे व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व तत्सम कामे करणे.

६. सदर मिळकत क्षेत्राच्या ठिकाणी बांधकामाची कार्यवाही अथवा इतर विकसनाकामी कामे चालू असतांना अपघात झाल्यास त्याबद्दलचे नुकसान भरपाईची व्यवस्था असावी या दृष्टीने इंशुरन्स पॉलिसीज घेणे व त्यांचा प्रिमीयम भरणे. परंतु याही परिस्थितीत सदर अपघाताची पुर्ण जबाबदारी म्हणजेच जिवित व मालमत्ता हानीबाबतची सर्व जबाबदारी ही लिहुन घेणार यांचीच राहणार आहे. मात्र भविष्यात नैसर्गिक वातावरण बदलामुळे बांधकाम पुर्ण झालेल्या इमारतीस हेअर क्रॅक्स आल्यास त्याची जबाबदारी लिहुन घेणार यांची राहणार नाही.

७. सदर मिळकत क्षेत्रावरील बांधुन होणारे इमारतीतील बांधीव लिहुन देणार यांना दिलेला भाग वगळता इतर भाग विक्री करणे संबधाने करारनामे, साठेखत करारनामे विसार पावती वगैर दस्तऐवज ति-हाईतांचे लाभात लिहुन देणे, त्यावर लिहुन देणार अथवा समंती देणार म्हणून सह्या करणे, ते करार नोंदवून देणे, करार कबुल करणे, नोंदणीकामी दुय्यम निबंधक साहेब यांचे कार्यालयात हजर राहणे, सह्या करणे, दस्तातील मजकुर कबुल करणे, इ.आवश्यक ती कामे करणे व करारनाम्याप्रमाणे भरणा स्विकारणे.

८. सदर मिळकत क्षेत्रावर बांधुन होणारे बांधीव भागापैकी लिहुन देणार यांना मोबदला म्हणून द्यावयाचे बांधीव भागाचे खरेदीखत एका अगर विविध दस्तऐवजाने लिहुन देणे व नोंदविण्यासाठी मे. दुय्यम निबंधक साहेब यांचे कार्यालयात हजर राहणे खरेदीखत नोंदल्याचे कबुल करणे, खरेदीखतावर मुखत्यार म्हणून सह्या करणे, व दस्तऐवज नोंदणीकामी इतर योग्य तो कार्यवाही करणे, तसेच त्याकामी चुक दुरुस्ती लेख लिहुन व नोंदवून द्यावा लागल्यास वरीलप्रमाणे योग्य ती

Scanned by CamScanner

नमुना-६

दस्त क्र. ८५७ /२०१८

१५-५५

कारवाई करणे. परंतु याकामी येणारा खर्च असे मुद्रांक शुल्क, नोंदणी फी, एल.बी.टी. / जी.ए
व इतर सर्व प्रकारचे सरकारी कर इ. खर्च हा लिहुन देणार यांनी करावयाचा व सोसावयाचा
तसेच लिहुन देणार सोसायटीतील सभासदांना लिहुन घेणार यांचेकडून विनामोबदला मिळ
अतिरीक्त बांधीव भागाचा मोबदल्याचे मिळकतीस नांवे लावणेकामी अगर खरेदीखत करणे
अगर सदर बांधीव भागाचे ॲलोटमेंट लेटर घेणेकामी येणारा सर्व प्रकारचा खर्च हा सभास
लिहुन घेणार यांनी करावयाचा आहे.

९. सदर मिळकत क्षेत्रासबंधाने जे काही दस्तऐवज लिहुन व नोंदवून द्यावयाचे आ
दस्तऐवजे लिहुन व नोंदवून देतांना मे. दुय्यम निबंधक साहेब यांचे समोर जे काही फॉर्म भरु
लागतात ते कबुल करणे.

१०. सदर मिळकती विकसीत करतांना सरकारी धोरणाप्रमाणे मिळकतीमध्ये को
प्रकारचे ॲक्वीझीशन होवून त्याबदला एफ.एस.आय. अथवा जादा एफ.एस.आय. मिळ
त्यासंबधी योग्य ती कारवाई करुन पुर्तता करुन सदरचा एफ.एस.आय. मंजुर करुन घेणे
नुकसान भरपाई मिळाल्यास त्याकामी योग्य ती कारवाई करणे व ती नुकसान भरपाईची
स्विकारणे. भविष्यात सदर मिळकतीचे विकसनाचे कामकाज पुर्ण झाल्यानंतर एफ.एस
वाढवून मिळाल्यास सदर एफ.एस.आय.हा लिहुन घेणार यांना बांधकामासाठी वापरता येणा
सदर बांधीव क्षेत्र हे लिहुन घेणार यांनी त्यांचेकडेच मोबदला म्हणून ठेवायचे आहे.

११. उपरोक्त मिळकती विकसीत करणेकामी लिहुन देणार यांना मोबदला म्हणून
बांधीव क्षेत्र वगळता लिहुन घेणार यांना राहणारे उर्वरीत बांधीव क्षेत्र हे तारण देऊन आ
भासल्यास वित्तीय संस्थेकडून याकामी कर्ज काढणेकामी आवश्यक असणारे अर्ज भ
त्यासाठी आवश्यक असणारे प्रतिज्ञापत्र भरुन देणे, तसेच बँकेच्या इतर हमीपत्रावर
कागदपत्रांवर मिळकत मालक म्हणून लिहुन देणार यांचेवतीने सह्या करणे, गहाणप
देतांनासदर मिळकत ही दुय्यम तारण म्हणून गरज आल्यास गहाण ठेवणे, सदरचे गहा
दुय्यम निबंधक साहेब यांचे कार्यालयात हजर राहून कबुल करुन नोंदवून देणे. गहाणखता
देणार यांचेवतीने सह्या करणे, कर्जाची रक्कम स्विकारणे, सदर गहाणखतातील मजकु
कबुल करणे इतर सर्व आवश्यक ती कामे लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांचेवतीने
देणार यांचेकरीता करणे. परंतु सदर कर्जफेडीची पुर्ण जबाबदारी ही विकसनकार म्ह
घेणार यांचीच राहणार आहे.

Scanned by CamScanner

नसन-६
दु.नं. ८४७ /२०१८
१६-५५



१२. सदर वित्तीय संस्थेचे अथवा बँकेचे कर्जाची परतफेड झाल्यानंतर गहाणमुक्त लेख लिहुन घेणे, त्याप्रमाणे सदर गहाणमुक्त लेख नोंदविणेकामी लिहुन घेणार, लिहुन देणार म्हणून गहाणमुक्त लेखावर सही करणे, सदर गहाणमुक्त लेख नोंदविणेकामी मे. दुय्यम निबंधक साहेब कार्यालयात हजर राहून कबुल करुन नोंदवून घेणे, तसेच इतर सर्व आवश्यक ती कामे करणे.

१३. सदर मिळकतीचे क्षेत्र अथवा त्यातील बांधीव भाग यांस खरेदी घेणारांची नांव लावून देणे व त्यासाठी अर्ज देणे, नोटीसा स्विकारणे, जाब जबाब देणे, तसेच इतर सर्व आवश्यक ती कामे करणे.

१४. वर वर्णन केलेली मिळकत क्षेत्रावरील बांधीव भागाचे कब्जे मिळकत विकत घेणार यांस हस्तांतरीत करुन घेणारास अथवा डेव्हलपर्स यांना देणे, त्याकरीता कब्जा पावती लिहुन देणे, त्यास लिहुन देणार यांचेकरीता व लिहुन देणार यांचे वतीने सह्या करणे.

१५. सदर मिळकतीच्या ठिकाणी इमारत बांधकामासाठी सरकारकडून नियंत्रीत भावामध्ये सिमेंट, लाकूड, लोखंड वगैरे साहित्य मिळकत असल्यास गाळा / फ्लॅट खरेदी घेणार यांचे कर्ज प्रकरणाकामी ना हरकत दाखल वा समंती देणे.

१६. सदर मिळकत क्षेत्रासबंधाने कोणत्याही प्रकारचे वाद उत्पन्न झाल्यास त्याचे निराकरण करणे, गरज पडल्यास त्यासाठी दिवाणी, फोजदारी, रेव्हेन्यु महानगरपालिका अगर अन्य न्यायालय, ऑफिसेस यांचेकडे दावा, रिट पिटीशन, अर्ज, रिव्हीव्ह अर्ज, अपील दाखल करणे, समक्ष हजर राहणे, काही दिवाणी स्वरुपाची कारवाई झाल्यास त्याचे समन्स, नोटीसा, रिट्स स्विकारणे, कोर्टात समक्ष हजर राहणे, जाब जबाब देणे, कैफियत दाखल करणे, प्रतिज्ञापत्र वगैरे दाखल करणे, अर्जाचा जबाब देणे, कैफियत दाखल करणे, प्रतिज्ञापत्र वगैरे दाखल करणे, उलट तपासणीकामी हजर राहणे, पुरावे सादर करणे, रक्कमा भरणे, रक्कमा काढणे, दाव्याकामी समझोता करणे, समझोता पुरसीस देने, त्यावर सह्या करणे, मजकुर मान्य व कबुल करणे, लिहुन देणार यांचेवतीने दाखल केलेला दावा अपील मागे घेणे, कोणत्याही अर्जावरील आदेशा विरुध्द तसेच दाव्याचे निकाला विरुध्द वरीष्ठ कोर्टात अपील, रिव्हीजन, रिव्ह्यु, रिट पिटिशन, व इतर प्रोसेडींग दाखल करणे.

१७. उपरोक्त कोर्ट कारवाई कामी वकील, बॅरीस्टर, यांची नेमणूक करणे, त्यांचे वकीलपत्रावर सह्या करणे, फी देणे.

१८. कोर्ट कारवाईसाठी झालेल्या हुकुमावरुन दरखास्ती दाखल करणे, त्यावर सह्या करणे, कब्जे वॉरंट अगर वॉरंट्स मिळविणे व बजावणे, दरखास्त काढून घेणे, इ. सर्व कामे लिहुन देणार

Scanned by CamScanner

नमुना-६

दस्त क्र. 1486/२०१८



यांचेकरीता व लिहुन देणार यांचेवतीने करावयाची आहेत.

१९. वर वर्णन केलेले मिळकतीचे क्षेत्र विकतीस करण्याचे दृष्टीने तसेच लिहुन देण मोबदला म्हणून मिळणारे बांधीव क्षेत्र व त्याकामी लागणारे तळ जागा क्षेत्र वगळता इतर त क्षेत्र व हरएक कारवाई करणे, तसेच मिळकत डेव्हलपमेंट कामी अथवा विक्रीकामी ज परवानग्या नाशिक महानगरपालिका, महसुल खाते, सिलींग खाते, इन्कम टॅक्स खाते, अ सबंधित अधिकारी ऑफिसेस यांच्याकडून घ्याव्या लागतील त्या त्या परवानग्या लिहुन यांचेकरीता यांचेवतीने मिळविणे, त्यासाठी अर्ज करणे, त्यावर लिहुन देणार यांचेकरीता व देणार यांचेवतीने सह्या करणे, जाब जबाब देणे, पुरावे सादर करणे, आवश्यक कागदपत्राची करणे, समक्ष हजर राहणे, प्रतिज्ञापत्र दाखल करणे, आदेशाच्या अथवा निकालाच्या विरुध्द कोर्टात दाद मागणे, इंडेम्नीटी बॉन्ड वगैरे दस्त करुन देणे व योग्य ती सर्व पुर्तता करुन आ त्या सर्व परवानग्या मिळविणे.

वरीलप्रमाणे अधिकारानुसार लिहुन घेणार हे जी जी कामे, कारवाई कराल ती ती सर्व कारवाई लिहुन देणार यांना मान्य व कबुल राहतील. तसेच वरीलप्रमाणे कामे करण्यासाठी अधिकार देण्याचे राहून गेलेले असल्यास ते अधिकारही मी तुम्हांस दिलेले आहे असे स जाईल व लिहुन घेणार यांनी केलेली कामे लिहुन देणार यांना मान्य व कबुल राहतील. प्रस्तुतचे दस्तासोबत लिहुन व नोंदवून दिलेले मुखत्यारपत्र हे वर नमुद अटींना अधीन राहून व रद्द न होणारे असे राहणार असून ते लिहुन घेणार व लिहुन देणार यांचेवर व त्यांचे वालीवार बंधनकारक आहे व राहील.

याप्रमाणे लिहुन घेणार यांनी लिहुन देणार यांचे वतीने कामे करावीत, दस्त लिहुन द्या लिहुन घेणार यांनी केलेली सर्व कामे ही लिहुन देणार यांनी स्वत हजर राहून केली आहेत समजले जाईल व ती कामे लिहुन दिलेले दस्तऐवज लिहुन देणार यांना मान्य व कबुल असत तसेच लिहुन देणार यांचेकरीता यांचेवतीने हक्क सांगणार यांचेवर बंधनकारक राहतील.

१५. लिहुन देणार हे या दस्तान्वये जाहिर करतात की, उपरोक्त मिळकत क्षेत्रावर येथुन लिहुन देणार कोणताही बोजा निर्माण करणार नाही व लिहुन देणार यांचेकडून करारासाठी मिळ कायम, सतत, निर्वेध व बिनबोजाची ठेवतील. सदर मिळकत क्षेत्राचे तुम्हांस विकस कोणत्याही प्रकारे हरकत अडथळे येऊ देणार नाही.

Scanned by CamScanner